जैन समाजात प्रचंड खपाचे व लोकप्रिय मासिक

# जैन जागृति

(Since 1969) www.jainjagruti.in

६२ ऋतुराज सोसायटी, पुणे-सातारा रोड, भापकर पेट्रोल पंपा समोर, सिटी प्राईडच्या पुढची लेन, पुणे ४११०३७.

मो. : ८२६२०५६४८०, ☎ : ०२० - २४२१५५८३

मोबाईल : संजय ९८२२०८६९९७, सुनंदा ९४२३५६२९९१



❖ संस्थापक ❖

स्व. श्री. कांतीलालजी चोरडिया

संपादक व प्रकाशक : संजय के. चोरडिया

सहसंपादक : सौ. सुनंदा एस. चोरडिया

❖ वर्ष ५६ वे ❖ अंक ४ था ❖ डिसेंबर २०२४ ❖ वीर संवत २५५१ ❖ विक्रम संवत २०८१

या अंकात — पान नं.


- महाराष्ट्र विधानसभा २०२४ - राजकारणाच्या क्षितिजावर जैन समाज — १५
- ''अभय प्रभावना'' संग्रहालय - उद्घाटन — १६
- श्री. महेंद्रजी बोकरिया - जैन कॉन्फ्रेंस — १९
- स्वागत जैन जागृति दीपावली अंकाचे — २१
- वाचकांचे मनोगत — २२
- जैन जागृति, चोरडिया परिवार - सन्मान — २३
- कव्हर तपशील — २४
- शास्त्रज्ञ श्री. प्रफुल्ल धारीवाल — २५
- अहंकार की चट्टान — ३१
- नफरत V/S प्यार — ३७
- जीन शासन के चमकते हीरे - सुदर्शन सेठ — ४३
- परंपरा संवाहक आचार्य — ४७
- मोक्ष मार्ग के २१ कदम - वैराग्य — ४९
- बिन जाने कित जाऊँ - प्रश्नोत्तरी प्रवचन — ५२
- तितली नहीं मधुमक्खी है आदर्श — ६३
- जीवन बोध - दर्पण — ६४
- Passward पासवर्ड — ६६
- मंत्राधिराज प्रवचन सार — ६७
- कडवे प्रवचन — ६९
- ऐसी हुई जब गुरु कृपा : घोडे री लगाम हाथ में राख — ७१
- सुविचार — ७३
- २२ डिसेंबर - गणित दिन — ७९
- डॉ. प्रितम धोका, पुणे - सन्मान — ८०
- सौ. सुषमा चोरडिया - पुरस्कार — ८०
- आर.एम.डी. फाऊंडेशन - वृक्षारोपन — ८१
- श्री. वालचंदजी संचेती, पुणे - निवड — ८१
- हास्य जागृती — ८२
- साध्वी कमलप्रज्ञा म.सा. - पीएच.डी. — ८३
- सौ. मधुबाला चोरडिया - पुरस्कार — ८३
- गिरी विहार ट्रस्ट - बागोदरा आरोग्य शिबीर — ८५
- क्रोध यशस्वी जीवनातील मोठा अडथळा — ९१
- धर्माच्या कौलम मध्ये जैन लिहा — ९३

● स्तवन – बरसा दाता सुख बरसा ९३
● सुर्यदत्त स्त्री शक्ती राष्ट्रीय पुरस्कार ९४
● जैन वधु–वर परिचय संमेलन, अहमदनगर ९४
● प्रा. सुरेखा कटारिया – पुरस्कार ९५
● ट्रायटॉन रेसिडन्सी प्रोजेक्ट, वडगावशेरी ९५
● महर्षि आनंद सेवा पुरस्कार, पुणे ९६
● जयराज स्पोर्टस् ॲण्ड कन्वेशन सेंटर, पुणे ९६
● जय आनंद ग्रुप, पुणे ९९
● पात्रता एव अपात्रता का चिन्तन १०१
● नामको हॉस्पिटल – नाशिक १०४
● सुरक्षा – तैयारी कीजिए और रोकिए १०५
● विविध धार्मिक, सामाजिक बातम्या


## जैन जागृति मासिकाचे वर्गणी दर

| | एक वर्ष | त्रिवार्षिक | पंचवार्षिक |
|---|---|---|---|
| साध्या पोस्टाने | ५०० | १३५० | २२०० |
| रजिस्टर पोस्टाने | ८०० | २२५० | ३७०० |

या अंकाची किंमत ५० रुपये.

Google Pay - Mob. : 9822086997

## सुसंस्कार व सदाचाराचा पुरस्कार करणाऱ्या 'जैन जागृति' मासिकाचे वर्गणीदार व्हा !

- वीतराग वाणी, आचार्य, साधू, साध्वी यांचे लेख, धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक लेख, धार्मिक कथा, बोधकथा, ऐतिहासिक पुरुषांचे जीवन चरित्र, तीर्थक्षेत्र परिचय, समाज प्रबोधन लेखमाला, दीपावली पूजन विधी व मुहूर्त, आरोग्य व गृहोपयोगी लेख, विविध बातम्या इ. साहित्य जैन जागृतित प्रकाशित केले जाते.
- आपण स्वत: जैन जागृतिचे ग्राहक बना व आपले नातेवाईक, मित्र, व्यापारी बंधू इत्यादींना वर्गणीदार नसतील तर त्यांना वर्गणीदार होण्यास सांगा. • 'जैन जागृति' मासिकाची वर्गणी भरून इतरांना भेट पाठवा.

जैन जागृति वर्गणी व जाहिरात – रोख/Google Pay - M. 9822086997/
AT PAR चेक/पुणे चेकने/RTGS इत्यादी द्वारा पाठवावी

**BANK ACCOUNT DETAILS - A/C Name : JAIN JAGRUTI**
**Bank : STATE BANK OF INDIA • Branch : Market Yard, Pune 37.**
**Current A/c No. : 10521020146 • IFS Code : SBIN0006117**


'जैन जागृति' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक एस. के. चोरडिया यांनी प्रकाश ऑफसेट, शॉप नं. १२–१३, पर्वती टॉवर्स, पुणे – ४११००९ येथे छापून ६२ बी, ऋतुराज सोसायटी, पुणे–सातारा रोड, पुणे – ४११ ०३७ येथे प्रसिध्द केले. संपादक – एस. के. चोरडिया

"Jain Jagruti" monthly magazine is owned, printed & published by S. K. Chordia, Printed at Prakash Offset, Shop No. 12-13, Parvati Towers, Pune 411009. Published at 62-B, Ruturaj Society, Pune - Satara Road, Pune - 411 037. Editor - S. K. Chordia




टिप : या अंकात प्रसिध्द झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. जैन जागृति संबंधित कोणत्याही कायदेशीर कारवाईसाठी पुणे न्यायलय क्षेत्र ग्राह्य धरले जाईल.

# महाराष्ट्र विधानसभा – २०२४
# राजकारणाच्या क्षितीजावर जैन समाज



श्री. मंगलप्रभातजी लोढा
मलबार हिल, मुंबई
(भाजपा)




श्री. प्रशांतजी बंब
गंगापूर, औरंगाबाद
(भाजपा)



श्री. चेनसुखजी संचेती
मलकापूर, बुलढाणा
(भाजपा)



श्री. परागजी शहा
घाटकोपर, मुंबई
(भाजपा)



श्री. नरेंद्रजी मेहता
मीरा भाईंदर, ठाणे
(भाजपा)



श्री. राहुलजी आवाडे
इचलकरंजी, कोल्हापूर
(भाजपा)



श्री. राजेंद्रजी पाटील
यड्रावकर
शिरोळ, कोल्हापूर
(अपक्ष)

# जैन ''समाज भूषण''
# हार्दिक अभिनंदन

# जैन तत्त्वज्ञान आणि भारतीय वारसाची माहिती सांगणारे भव्यदिव्य ''अभय प्रभावना'' संग्रहालय : नॉलेज सेंटर केंद्रिय मंत्री श्री. नितीनजी गडकरी यांच्या हस्ते - उद्‌घाटन



पुणे : मावळ तालुक्यात इंद्रायणी नदीच्या निसर्गरम्य काठावर पारवडी येथे ५० एकर जागेत ३.५ लाख चौरस फुट बांधकाम जागेवर दहा वर्षाच्या अथक प्रयत्नाने ४०० कोटी रुपये खर्च करुन जैन तत्त्वज्ञान आणि भारतीय वारसा समर्पित आंतराष्ट्रीय स्तराचे अभय प्रभावन संग्रहालयाची निर्मिती करण्यात आली आहे. फोर्स मोटर्सचे अध्यक्ष अभयजी फिरोदिया यांच्या संकल्पनेतून जैन तत्त्वज्ञान आणि भारतीय वारसा यांना समर्पित असलेल्या 'अभय प्रभावन' या संग्रहालयाचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले.

त्यावेळी ते बोलत होते. भारतीय मूल्य प्रणाली आणि समकालीन समाजात जैन मूल्यांची प्रासंगिकता यावर आधारित हे संग्रहालय आहे. केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे, आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे न्यायमूर्ती दलवीरजी भंडारी, माजी केंद्रीय मंत्री मेनकाजी गांधी, मेवाड राजघराण्याचे लक्ष्यराजजी सिंह, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, गुरुदेवश्री राकेशजी, आचार्य चंदनाजी महाराज, दलाई लामा यांचे प्रतिनिधित्व करणारे सिलिंग टोंगखोर रिनपोचे हे उपस्थित होते.

**'नव्या पिढीला दिशा देणारे नॉलेज सेंटर'**

फिरोदिया यांनी आर्थिक व्यापार, उद्योग या क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. या सोबतच पुढील पिढीला दिशा देणारे 'नॉलेज सेंटर' त्यांनी या संग्रहालयाच्या माध्यमातून सुरु केले आहे. हे 'नॉलेज सेंटर' त्यांच्या कारकिर्दीतील सर्वोच्च योगदान आहे, असे मी मानतो. सत्ता, साधन, संपत्ती, सौंदर्य या नश्वर गोष्टी असतात. त्यामुळे जीवन किती जगला, यापेक्षा कसा जगला हे महत्त्वाचे असते, असे लोकमान्य टिळक म्हणत असत. त्याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे फिरोदिया यांचे जीवन आहे, असे गौरवोद्‌गार गडकरी यांनी या वेळी काढले.

प्रेरणा ट्रस्टचे अध्यक्ष अभयजी फिरोदिया यांनी

'अभय प्रभावन' हे श्रमण आणि जैन परंपरेच्या सखोल मूल्यांचा सन्मान करणारे संग्रहालय आहे. या मूल्यांचा प्रभाव हा हजारो वर्षापासून देशाच्या नैतिक आणि सांस्कृतिक गाभ्यात आहे. हे संग्रहालय शिक्षण, व्यावसायिकता आणि नीतिमत्तेच्या तत्त्वांचा प्रचार करत केवळ संकल्पना म्हणून नव्हे तर सामाजिक मुल्य म्हणून प्रतिबिंबित करते. हे व्यक्तींना संतुलित आणि उद्देशपूर्ण जीवनासाठी मार्गदर्शन करेल. जैन धर्माद्वारे व्यक्त केलेल्या भारतीय सभ्यतेच्या आदर्श दहा मूल्यांचा शोध घेण्यास आणि त्यांच्याशी जोडण्यासाठी हे संग्राहलय लोकांना प्रेरणा देईल अशी आशा आहे.

**अशा आहेत संग्रहालयातील सुविधा**

* ५० एकर जागेवर ३.५ लाख चौरस फुट बांधकाम.
* ३५० पेक्षा जास्त अद्वितीय कलाकृती, शिल्पे आणि भव्य प्रतिकृती
* विशेष रचना केलेली ३० कलादालने.
* ३५ प्रोजेक्टर, ६७५ ऑडिओ स्पीकर्स.
* ८००० लाइटिंग फिक्सर, ६५० टन अचव्हीएसी लोड, २३० किओस्क, २ एमव्हीएचे इलेक्ट्रिकल डिमांड लोड आहेत.
* सामाजिक स्तरावर सुरक्षा, उत्पादकता, समृद्धी, आणि वैयक्तिक स्तरावर करुणा, मुक्त विचारसरणी आणि नैतिक जीवन या जैन मूल्यांवर लक्ष केंद्रित.
* अद्ययावत ऑडिओ-व्हिज्युअल्स, ॲनिमेशन, व्हर्च्युअल रिॲलिटी आणि परस्पर संवाद आदी प्रणालींनी समृद्ध.
* जैन तत्त्वज्ञानातील आध्यात्मिक संकल्पना सोप्या पद्धतीने समजावून सांगण्याचा उद्देश.


**संपर्क : अभिजीत धुमाळ,**
**मो. : ७३९१०४३१७१, ७०२८०२३८६५** •

# दवा रहित जीवन

१. जल्दी सोना और जल्दी उठना दवा है।
२. Om का Jap दवा है।
३. योग प्राणायाम और व्यायाम दवा है।
४. सुबह-शाम टहलना भी दवा है।
५. उपवास सभी बीमारियों की दवा है।
६. सूर्य का प्रकाश भी दवा है।
७. साफ पानी पीना भी दवा है।
८. ताली बजाना भी दवा है।
९. खूब चबाना भी दवा है।
१०. भोजन की तरह चबाकर पानी पीना भी दवा है।
११. वज्रासन में बैठना दवा है।
१२. खुश रहने का निर्णय भी दवा है।
१३. कभी-कभी मौन भी दवा है।
१४. हँसी-मजाक दवा है।
१५. संतोष भी दवा है।
१६. मन और शरीर की शांति दवा है।
१७. ईमानदारी व सकारात्मकता दवा है।
१८. नि:स्वार्थ प्रेम, भावना भी दवा है।
१९. सबका भला करना भी दवा है।
२०. ऐसा कुछ करना जिससे किसी की दुआ मिले, वह दवा है।
२१. सबके साथ मिलजुल कर रहना दवा है।
२२. परिवार के साथ खाना-पीना और घुलना-मिलना भी दवा है।
२३. आपका हर सच्चा और अच्छा दोस्त भी बिना पैसे के पूरा मेडिकल स्टोर है।
२४. मस्त रहें, व्यस्त रहें, स्वस्थ रहें और खुशमिजाज रहें, यह भी दवा है।
२५. हर नए दिन का भरपूर आनंद लेना भी दवा है।
२६. प्रकृति की ''महानता'' को समझना भी दवा है।

ये सभी औषधियाँ बिल्कुल नि:शुल्क उपलब्ध हैं। •

## स्वागत ''जैन जागृति'' दीपावली अंक




### सकाळ

जैन संप्रदाया विषयी माहिती सांगणाऱ्या जैन जागृति या दिवाळी अंकात प्राकृताचे अभिजाततत्व व जैन, पूर्णिमासे भी अधिक उजली व उजाली अमावस्या, श्री पावापुरी तीर्थ - बिहार, रत्न संदेश, लौकिक एवं आध्यात्मिक पर्व : दीपोत्सव, इतिहास बनाने आ गई - देखो भैया दूज, वाणी का संयम, आओ - घर को आनंदमय बनाए, दु:ख मुक्ती का एकमात्र उपाय - आपकी मुस्कान, सुखशांती का मूलमंत्र : निभना और निभाना, बिन जाने कित जाऊ, जैन धर्म और महात्मा गांधी, सच्चा उत्तराधिकारी, बिखरे मोती, मोक्षमार्ग के २१ कदम : दान, उत्तम व्यापाराचा फंडा अशा विविध लेखांचा, कथांचा समावेश आहे. अंकात दिवाळी सणातील विविध उत्सवांविषयी माहिती देण्यात आली आहे.

संपादक : संजय चोरडिया,
पाने : २८४, किंमत : १०० रुपये •


**जैन समाजाची आवड**
**जैन समाजाची निवड**
**जैन जागृति**


### संध्यानंद

## जैन जागृति : धार्मिक, सामाजिक तत्त्व जपणारा दिवाळी अंक

अंकाचे नाव : जैन जागृति
संपादक : संजय चोरडिया, सौ. सुनंदा चोरडिया
मोबाईल नं. : ९८२२०८६९९७
पाने : २८४
मूल्य : रु. १००/-

साहित्य संस्कृतीत दिवाळी अंकांचे एक वेगळे स्थान आहे. १२५ वर्षांहून अधिक काळ दिवाळी अंकांनी मराठी साहित्यात वेगळेपण जपले आहे आणि या साहित्य संस्कृतीत 'जैन जागृति' या दिवाळी अंकाला ५६ वर्षाचा इतिहास आहे. सामाजिक आणि धार्मिक भान जपत या दिवाळी अंकाने दीपावलीची शोभा वाढवली आहे.

यंदाही या दिवाळी अंकाने परंपरा आणि आधुनिकता यांची सांगड घातलेली आहे आणि अंकाच्या सुरुवाती पासूनच ते लक्षात येते. दरवर्षीप्रमाणे अंकात दीपावली पूजन, दीपावली पूजनाचे मुहूर्त आदी सविस्तर माहिती जैन शास्त्रानुसार देण्यात आली आहे. वही पूजन (चोपडा पूजन), लक्ष्मी पूजन यांची विधिवत माहिती नेहमीच मार्गदर्शक ठरणारी आहे.

३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी बरोबरच प्राकृत भाषेलाही 'अभिजात भारतीय भाषे'चा दर्जा प्रदान करण्यात आला आहे. या गोष्टीची दखल अंकाने चांगल्या पद्धतीने घेतली आहे. इ.स.पूर्व ६०० पासून म्हणजेच महावीर वाणीपासून सुरु झालेला प्राकृतचा हा प्रवाह अविरत आहे. ८० टक्के जैन साहित्य रचना या याच भाषेची मूळे आहेत. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि धार्मिक अधिष्ठान असलेली या

भाषेचा आणि त्यावर सुरु असलेल्या कार्याचा आढावा घेणारा डॉ. नलिनी जोशी यांचा लेख हे अंकाचे वैशिष्ट्य आहे.

अमावस्ये बाबत आपल्याकडे अनेक रुढी-परंपरा आणि समज आहेत. यावर प्रकाश टाकणारा 'पूर्णिमे से भी अधिक उजली है अमावस्या' हा लेख आहे. दिवाळी अमावस्या... अश्विन अमावस्या... तीर्थंकर भगवान महावीरांचे निर्वाण कल्याणक... या दिवशीचे महत्त्व, गौतम स्वामींना प्राप्त झालेले केवलज्ञान, सुधर्मा स्वामींचा आचार्य पदाभिषेक, उत्तराध्ययन सूत्र आणि सर्व प्राचीन वीर संवत यामधून या लेखात सप्रमाण माहिती वाचायला मिळते. याच अनुषंगाने बिहारमधील पावापुरी तीर्थक्षेत्राचे ऐतिहासिक महत्त्व देखील अवर्णनीय आहे.

दिपावलीशी संबंधित या लेखांबरोबरच 'वाणी का संयम', 'नैतिक आणि सामाजिक जीव में कर्म की उपदेयता', 'नफरत V/s प्यार, 'सुख शांती का मूलमंत्र : निभना और निभाना', 'मोक्ष मार्ग के २१ कदम : दान', 'जैन संप्रदाय तुलनात्मक तालिका२०२४' आदी लेख धार्मिक आणि मानसिक उद्‌बोधन करणारे आहेत. याबरोबरच 'संस्करित समाज का दिमक : प्री-वेडिंग फोटोशूट', 'लडकियाँ क्यों दूसरे समुदाय में जाती है', 'विवाह : एक ज्वलंत समस्या' आजच्या गंभीर समस्येवर सटिक प्रकाश टाकणारे हे लेख आहेत.

अंकाच्या मुखपृष्ठापासून अंकाचे वेगळेपण जपले आहे. पुण्यात आणि पुण्याबाहेर देखील झालेल्या महत्त्वाच्या सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक घडामोडी, समाजातील मान्यवरांना मिळालेले पुरस्कार यांची दखल देखील अंकात घेतली गेली आहे. या अंकाचे संस्थापक स्व. कांतिलालजी चोरडिया आहेत. •

# वाचकांचे मनोगत

## जैन जागृति मासिकाने आपली विश्वासार्हता व नावलौकीक कायम ठेवला

पुणे : माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२४ जैन जागृतिचा संयुक्त अंक मिळाला. तीर्थंकर श्री महावीर स्वामी निर्वाण कल्याण महोत्सव, भगवान गणधर श्री गौतम स्वामी केवलज्ञान महोत्सव व शुभ दीपावली च्या निमित्ताने हा विशेष अंक प्रकाशित करण्यात आला आहे. सदर अंक अत्यंत उत्कृष्ट असून प्रत्येकाने संग्रही ठेवण्या सारखा आहे.

जैन जागृति मासिकाचे देहूरोड मधील आम्ही पहिले सदस्य आहोत. सदर मासिका मध्ये अभिजातत्व प्राकृतचे आणि मराठीचे हा डॉ. नलिनी जोशी यांचा लेख, जैन धर्म और महात्मा गांधी व कविरत्न डॉ. दिलीप धिंग यांचा लेख, नैतिक व सामाजिक जीव में कर्म की उपदेयता व डॉ. वीरचंद्र जैन यांचे लेख खूपच उत्कृष्ट आहेत. जैन दर्शनानुसार आठ प्रकारच्या कर्माची प्राथमिक माहिती त्यांनी सहदाहरण अतिशय सोप्या भाषेमध्ये दिली आहे. जी सर्वसामान्य श्रावकाला सहज लक्षात येईल. अंकातील इतरही लेख अत्यंत वाचनीय आहेत. आचार्य मुक्तीसागर सूरीश्वरजी महाराज साहेब यांचे 'बिन जाने कीत जाऊ' ही प्रश्नोत्तरी मालिका ज्ञानात भर घालणारी आहे.

तसेच 'संस्कारीत समाज का दिमक प्री-वेडिंग फोटोशूट' या लेखात लेखकाने सद्यस्थितीवर जैन समाजाच्या व्यापक हिताच्या दृष्टिकोनातून चिंता व्यक्त केली आहे. परंतु प्री-वेडिंग फोटोशूटचे वेड सर्वसामान्य जैन कुटुंबात नसून श्रीमंत वर्गामध्ये हे प्रतिष्ठेचे मानले जात आहे. याबाबत जैन धर्माचे नेतृत्व करणाऱ्या मोठमोठ्या पिढी, जैन कॉन्फरन्स यांनी स्वतः पासून सुरुवात करून आदर्श निर्माण करून द्यावा लागेल. अन्यथा ही आमची वैयक्तिक बाब

असून दुसऱ्याशी आम्हांला काही घेणे देणे नाही अशीच प्रवृत्ती वाढीस लागेल. धर्माचे नेतृत्व करणाऱ्यांनी याबाबत आदर्श निर्माण करायला हवा.

जी गत प्री-वेडिंगची आहे तीच बाब संध्याकाळच्या लग्नाची व मिष्टान्न भोजनाची आहे. यावर अनेक वेळा वेगवेगळ्या स्तरावर निर्णय होऊनही त्याची अंमलबजावणी होत नाही. यासाठी धर्माच्या पदाधिकाऱ्यांनी व नेत्यांनी स्वतःपासून सुरुवात करून आदर्श निर्माण केला पाहिजे.

भारतामध्ये अनेक जैन प्रकाशक असून त्यामध्ये पुण्यातून प्रसिद्ध होणारे जैन जागृति मासिकाने आपली विश्वासार्हता व नावलौकिक नेहमीच कायम ठेवला आहे. प्रत्येक महिन्याच्या अंकांमध्ये जैन धर्मा विषयी अत्यंत आवश्यक अशी वेळोवेळी माहिती देण्यात येते. सदर लेख वाचताना डोके फार जड होऊ नये म्हणून बिखरे मोती आणि हास्य जागृती हे दोन सदर आहेत. जैन जागृति मासिकाची अशीच उत्तरोत्तर प्रगती होऊन मोठ्या प्रमाणावर वाचक वर्ग तयार व्हावा हीच

**जैन जागृति**

**Since 1969**

## ''धर्म प्रभावना'' व ''समाज सेवा'' या सुंदर कार्यासाठी सन्मान !



**जैन जागृति मासिक - चोरडिया परिवार गत ५६ वर्षांपासून अखंड पणे जिनवाणी, साधू-संत व जैन समाजाची सेवा करीत आहे.**

**जैन जागृति मासिकाच्या सुंदर कार्याबद्दल श्री. संजयजी चोरडिया व सौ. सुनंदाजी चोरडिया यांचा विशेष सन्मान जैन श्रावक संघ, साधना सदन, महावीर प्रतिष्ठान, पुणे येथे गुरुदेव प.पू. गौतममुनिजी म.सा. व प.पू. चेतनमुनिजी म.सा. यांच्या सान्निध्यात श्री संघाचे ट्रस्टी श्री. विजयकांतजी कोठारी, श्री. वालचंदजी संचेती, श्री. विजयजी भंडारी, सौ. राजश्रीजी पारख, श्री. विजयजी धोका, श्री. नितीनजी ओस्तवाल, श्री. जवाहरलालजी बोथरा, श्री. आदेशजी खिंवसरा यांच्या हस्ते करण्यात आला.**

## कव्हर तपशील - डिसेंबर २०२४




❖ **''अभय प्रभावना'' संग्रहालय – उद्घाटन**

जैन तत्त्वज्ञान आणि भारतीय वारसाचे माहिती सांगणारे भव्य दिव्य ''अभय प्रभावना'' संग्रहालय – नॉलेज सेंटरचे उद्घाटन केंद्रिय मंत्री श्री. नितीनजी गडकरी यांच्या हस्ते संपन्न झाले. (बातमी पान नं. १६)

❖ **जैन जागृति, चोरडिया परिवार – सन्मान**

धर्म प्रभावना व समाज सेवेच्या सुंदर कार्यासाठी जैन जागृति – चोरडिया परिवारांचा सन्मान जैन श्रावक संघ साधना सदन, महावीर प्रतिष्ठान, पुणे येथे करण्यात आला. (बातमी पान नं. २३)

❖ **शास्त्रज्ञ प्रफुल्ल धारीवाल**

सॅन फ्रान्सीस्को, अमेरिका व पुणे येथील शास्त्रज्ञ श्री. प्रफुल्ल धारीवाल याने ओपन ए.आय., जीपीटी ४ ओ – यांचा विकास करण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. (बातमी पान नं. २५)

❖ **जय आनंद ग्रुप, पुणे**

जय आनंद ग्रुप पुणे तर्फे श्री. राजेंद्रजी बाठिया यांना समाज भूषण व श्री. आदेशजी खिंवसरा यांना मानव सेवा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. (बातमी पान नं. ९९)

❖ **सौ. मधुबाला चोरडिया, आद्या हर्बल – पुरस्कार**

सौ. मधुबाला राजकुमारजी चोरडिया – आद्या हर्बल यांना फेमिना अचीवर्स २०२४ पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.
(बातमी पान नं. ८३)

❖ **आर.एम.डी. फाऊंडेशन – वृक्षारोपण**

आर.एम.डी. फाऊंडेशन द्वारा वृक्षारोपणचे कार्यक्रम विविध ठिकाणी फाऊंडेशनच्या उपाध्यक्षा शोभाताई आर. धारिवाल यांच्या नेतृत्वात संपन्न झाले. (बातमी पान नं. ८१)

❖ **सूर्यदत्त स्त्री शक्ति राष्ट्रीय पुरस्कार**

सूर्यदत्त स्त्री शक्ति राष्ट्रीय पुरस्कार २०२४ हा राजयोगीनी बी. के. सुनित दीदी यांना प्रा. डॉ. संजयजी चोरडिया व सौ. सुषमाजी चोरडिया यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.
(बातमी पान नं. ९४)

❖ **डॉ. प्रितम धोका, पुणे**

स्वारगेट पुणे येथील डॉ. प्रितम धोका यांना आर्थोडोनिटक्स क्षेत्रातील योगदाना बद्दल नवी दिल्ली येथे भारत गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. (बातमी पान नं. ८०)

❖ **ट्रायटॉन रेसिडेन्सी प्रोजेक्ट – वडगाव शेरी, पुणे**

वडगांव शेरी, पुणे येथील प्रसिद्ध बिल्डर्स व समाज सेवी श्री. प्रफुल्लजी, श्री. मितेशजी कोठारी यांच्या नवीन ट्रायटॉन रेसिडेन्सी प्रोजेक्टला सुरवात झाली. नगर रोड टच वडगाव शेरी च्या प्रोजेक्टरमध्ये डॉ. चंदनाजी म.सा. आदि ठाणा ८ यांच्या सान्निध्यात जाप करण्यात आला.
(बातमी पान नं. ९५) •

**जास्तीत जास्त जैन समाजापर्यंत पोहचण्याचा सर्वांत खात्रीशीर, सर्वांत सोपा व सर्वांत रिजनेबल मार्ग...**

**जैन जागृति**

# शास्त्रज्ञ श्री. प्रफुल्ल धारीवाल – सॅनफ्रांसिस्को, अमेरिका
# ओपन ए आय, जीपीटी ४ ओ – विकास करण्यात महत्त्वपूर्ण योगदान





ओपन ए आय, सीईओ, सॅम ऑल्टमन यांनी प्रफुल्लचे कौतुक ट्विट केल्यानंतर तो प्रसिद्धी झोतात आला. ओपन ए आय कंपनीच्या नवीन (ए आय) आर्टिफिशियल इंटेलिजन्स मॉडेल चॅट जीपीटी ४–ओमनी विकास करण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. १६ मे रोजी सोशल मिडीया प्लॅटफॉर्म एक्स वरील पोस्ट मध्ये प्रफुल्लचे कौतुक करताना सॅम ऑल्टमन म्हणाले, दीर्घ काळापर्यंत प्रफुल्लची दृष्टी (व्हिजन), प्रतिभा (टॅलेंट), खात्री (कन्विक्शन) आणि दृढ निश्चिय (डिटरमिनेशन) असल्या शिवाय जीपीटी ४ ओ घडले नसते. प्रफुल्लच्या आणि इतर अनेकांच्या प्रयत्नांमुळे आम्ही संगणक कसे वापरतो, यात क्रांती होईल अशी मला आशा आहे.

प्रफुल्ल फेब्रुवारी २०१७ पासून ओपन ए आय सॅनफ्रान्सिको अमेरीका येथे संशोधन शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत. तो जीपीटी ३ (टेक्स्ट–टु–इमेज प्लॅटफॉर्म), डॅली–ई–२, म्युझिक जनरेटर ज्युकबॉक्स, रिव्हर्सिबल जनरेटिव्ह मॉडेल ग्लो सह अनेक ए आय मॉडेल्सचा सह–निर्माता आहे.

**Sam Altman**
@sama · Follow

**GPT-4O would not have happened without the vision, talent, conviction and determination of@prafdhar over a long period of time. that (along with the work of many others) led to what i hope will turn out to be a revolution in how we use computers.**

प्रफुल्लने मॅसेच्युसेटस इन्स्टिटट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, बोस्टन, अमेरिका येथून कॉम्प्युटर सायन्स आणि मॅथ्स विषयात बॅचलर पदवी घेतली आहे.

प्रफुल्लने २००९ मध्ये चीन येथे आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र ऑलिम्पियाड मध्ये सुवर्णपदक जिंकले. २०१२ अर्जेटिना येथे आंतरराष्ट्रीय गणितीय ऑलिम्पियाड आणि २०१३ मध्ये डेन्मार्क येथे आंतरराष्ट्रीय फिजिक्स ऑलिम्पियाड मध्ये तिसरे सुवर्णपदक जिंकले.

प्रफुल्लचे आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि मॅथ्स यावर आंतरराष्ट्रीय २० रिसर्च पेपर आहेत.

प्रफुल्ल याचे वडील पुणे निवासी सुशिलजी धारीवाल आयआयटी मधून बी.टेक. आहेत. त्यांची सिरमिक्सची फॅक्टरी आहे. प्रफुल्लची आई सौ. अलका धारीवाल पुण्यातील एमआयटी इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये प्राध्यापिका म्हणून कार्यरत होत्या. प्रफुल्लची मोठी बहिण दिपल अमेरिकेत मायक्रोसॉफ्ट मध्ये मॅनेजर आहे.

शास्त्रज्ञ श्री. प्रफुल्लजी धारीवाल यांच्या विविध संशोधना बद्दल हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा ! •